हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

औरंगाबादकरांनी मागे राहू नये

महामॅरेथॉनसाठी 'लोकमत'ने घेतलेला पुढाकार आणि आयोजनाबाबतची मेहनत पाहता हा उपक्रम औरंगाबादला नवी ओळख करुन देणारा ठरणार, हे निश्चित. औरंगाबादसाठी आणि औरंगाबादकरांसाठी ही स्पर्धा होत असल्याने औरंगाबादकरांनी मागे न राहता हिरीरीने सहभाग नोंदवावा. औरंगाबादची महामॅरेथॉन देशाच्याच नव्हे, तर जगाच्या नकाशावर येऊ शकते. यासाठी 'लोकमत'च्या प्रयत्नांना औरंगाबादकरांची साथ निश्चितच मिळेल, असा विश्वास वाटतो.

- संदीप झा, अध्यक्ष,

शारीरिक क्षमतेची कसोटी

मॅरेथॉन ही शारीरिक क्षमतेची कसोटी पाहणारी स्पर्धा आहे. तुमचा शारीरिक जोम आजमावून पाहण्याची संधी यातून मिळते. त्यासाठी कसून तयारीची गरज असते. म्हणून तर सातत्यपूर्ण आरोग्य कायम राखण्याचा एक 'सिम्बॉल' म्हणून मी मॅरेथॉनकडे पाहतो. शिवाय आपल्या मित्र परिवारासोबत काही आनंदाचे क्षण व्यतीत करण्याचीही संधी मिळते.

- डॉ. उन्मेश टाकळकर, सिग्मा हॉस्पिटल

विकास डेव्हलपर्स... (डावीकडून) रवींद्र निकम, रुपेश दाभाडे, सिद्धेश्वर जडगे, संतोष सोनुने, जयवंत ढोले, गणेश पवार, कुणाल कासार, विकास चौधरी, पवन पोतरवार, अभिषेक राजकर, नीळकंठ पिंगळे, सचिन वर्मा, आसाराम गायके, राजेंद्र मोहरकर, अतुल पवार.



सवेरा ग्रुप... (डावीकडून) अभिजित क्षीरसागर, उमेश सतर्के, सुनील बागूल, अतुल वांडगळे, अभिजित चव्हाण, प्रतीका चॅटर्जी, राहुल गायकवाड, नीलेश सोमवंशी, किशोर राजपूत, गोपाल नवसरे, नवनाथ सुरासे, अविनाश राजपूत, महेश अंकुश, धीरज पाटील, मारुती चिरलेगे, राजेंद्र काटे, स्वरुप शेरकर, सुहास मुळे, महादेव प्रधान, विष्णू माजलकर, ज्ञानेश्वर विंधे.

T-Shirt Partner: SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors: SARA
In Association with: WOCKHARDT, LIFE WINS, varroc
Food & Beverage Partner: Frut-X
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty
Health & Drink Partner: Vedika Care n Cure
Outdoor Partner: abhishek
Healthcare Partners: VIDEOCON, SETH NANDLAL DHOOT HOSPITAL, CIGMA HOSPITAL
Race Management: YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner: RELAX-ZEAL
Water Partner: COOLZY
Supported by
Banking Partners: बैंक ऑफ बड़ौदा Bank of Baroda, Bank of India
Sound Partner: S.S.PRO, Northern Pro Lights
Mall Partner: PROZONE
Sports Partners

विविध मागण्यांसाठी क्रांतीचौकातून घोषणा देत माथाडी कामगारांनी मोर्चा काढला होता.

सभापतींनी घेतला अधिकाऱ्यांच्या खुर्चीचा ताबा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामध्ये प्रवास भाडे सवलतीच्या पाससाठी आलेल्या अपंगांना कर्मचाऱ्यांनी दिवसभर ताटकळत ठेवले. दरम्यान, या प्रकरणाची माहिती मिळताच सभापती धनराज बेडवाल यांनी कार्यालयाला भेट दिली व समाजकल्याण अधिकाऱ्याच्या खुर्चीचा ताबा घेतला. सभापती बेडवाल, जि. प. सदस्य किशोर बलांडे, बबन कुंडारे आदींनी समाजकल्याण विभागाला अचानक भेट दिली तेव्हा हजर नसलेल्या कर्मचाऱ्यांची गैरहजेरी नोंदविण्यात आली. विभागामध्ये अनेक अपंग व्यक्ती सकाळपासून ठाण मांडून होते. पास देण्यासाठी अपंगांकडून त्यांची मूळ कागदपत्रे घेऊन कर्मचारी कार्यालयाबाहेर निघून गेल्यामुळे त्यांच्यावर दिवसभर ताटकळत बसण्याची वेळ आली. बेडवाल, बलांडे, कुंडारे आणि कलीम पटेल यांनी संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी केली. तेव्हा ते हालचाल रजिस्टरमध्ये नोंद न घेता गायब असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे कार्यालयात हालचाल रजिस्टरही नव्हते.

गैरहजर कर्मचाऱ्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याचे सभापती बेडवाल यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरीकांसाठी
निःशुल्क डोळ्यांची तपासणी
वय ५० व त्यापुढील
9 डिसेंबर 2017 रोजी
सकाळी 10 ते 5
EYE Q
आय-क्यू सुपर स्पेशॅलिटी नेत्र रुग्णालय
निशुल्क मधुमेह व रक्तदाब तपासणी
नोंदणी शुल्क रु ३०/-
पहिला मजला, साई बिझनेससेंटर, हॉटेल यशोदीप शेजारी, सेव्हन हिल उड्डान पुलाजवळ, जालना रोड, औरंगाबाद . संपर्क : 0240-6600443.
मोतिबिंदू । रेटिना । लेसिक । काचबिंदू । जनरल आय चेकअप । औषधे । ऑप्टिकल्स

आंतरजिल्हा बदली : ४० जणांच्या मुख्यालयात चकरा; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे फाईल

पदस्थापनेसाठी शिक्षकांत रस्सीखेच

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आंतरजिल्हा बदलीने आलेल्या सुमारे ४० शिक्षकांमध्ये पदस्थापना मिळण्यासाठी रस्सीखेच सुरु झाली आहे. सदरील शिक्षक हे पदस्थापनेसाठी रोज जिल्हा परिषदेत चकरा मारत असून, यामध्ये काही गरोदर माता व स्तनदा माता शिक्षिकांचाही समावेश आहे.

यासंदर्भात मिळालेली माहिती अशी की, आंतरजिल्हा बदलीने दुसऱ्या जिल्हा परिषदेतून आलेल्या शिक्षकांना सुरुवातीला १० ऑगस्ट रोजी समुपदेशन पद्धतीने पदस्थापना दिली होती. यामध्ये जवळपास १६ शिक्षिकांपैकी काही स्तनदा माता, तर काही गरोदर माता शिक्षिकांचा समावेश आहे. तथापि, गैरसोयीच्या शाळा गरोदर माता व स्तनदा माता शिक्षिकांच्या वाट्याला आल्यामुळे सदरील शिक्षिका पदस्थापना मिळालेल्या शाळांवर रुजू झाल्या नाहीत. त्यांनी सोयीची शाळा मिळावी म्हणून शिक्षण विभागाकडे विनंती केली. दरम्यानच्या काळात ग्रामविकास विभागानेही गरोदर माता व स्तनदा माता शिक्षिकांना सोयीच्या शाळा देण्याचे परिपत्रक जारी केले.

दरम्यान, जिल्हांतर्गत बदलीची प्रक्रिया सुरु असल्यामुळे या शिक्षिकांना कोणत्या ठिकाणी पदस्थापना द्यावी, हा पेच जिल्हा परिषदेसमोर निर्माण झाला होता. पोर्टलवर रिक्त जागा दिसत नसल्यामुळे शिक्षण विभागाने या शिक्षिकांना पदस्थापना दिली नव्हती. अशातच आंतरजिल्हा बदलीने आणखी १६ शिक्षक औरंगाबाद जिल्हा परिषदेत दाखल झाले, तर ६ शिक्षकांना पदस्थापना बदलून देण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी जिल्हा परिषदेला दिले आहेत. अलीकडे जिल्हांतर्गत बदलीचा पेचही मिटला. या घटनेला पंधरा दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाला; पण अद्यापही रिक्त जागांचे पोर्टल खुले झाले नाही. त्यामुळे शिक्षण विभाग या शिक्षकांना पदस्थापना देऊ शकले नाही. आता गरोदर माता-स्तनदा माता शिक्षिकांना अगोदर पदस्थापना मिळणार की, अलीकडच्या काळात नव्याने आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना, असा प्रश्न निर्माण झाला असून या दोन्ही शिक्षकांमध्ये पदस्थापनेसाठी रस्सीखेच सुरु झाली आहे. परवा स्तनदा माता शिक्षिकांनी आपल्या तान्हुल्यांनाच सोबत घेऊन शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अध्यक्ष, शिक्षण सभापती आदींची कार्यालये गाठून पदस्थापना मिळण्याची विनंती केली.

सोमवारपर्यंत मिळेल पदस्थापना

◆ यासंदर्भात सूत्रांनी सांगितले की, आंतरजिल्हा बदलीने आलेल्या १६ शिक्षक, गरोदर व स्तनदा माता असलेल्या १५ शिक्षक आणि विभागीय आयुक्तांनी पदस्थापना बदलून देण्याचे आदेश मिळविलेले ६ शिक्षक या सर्वांना पदस्थापना देण्यासाठी शिक्षण विभागाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे फाइल सादर केली आहे. यांना सोमवारपर्यंत पदस्थापना मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

उत्कर्ष पॅनलचे पदवीधर गटात निर्विवाद वर्चस्व

विद्यापीठ अधिसभा : 'अभाविप' प्रणीत विद्यापीठ विकास मंचचा दणदणीत पराभव

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पदवीधर अधिसभेच्या गटात मराठवाडा पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या उत्कर्ष पॅनलने सर्वच सर्व जागा मोठ्या फरकाने जिंकल्या आहेत. 'अभाविप'प्रणीत विद्यापीठ विकास मंच, युवा सेना व भाविसे प्रणीत शिवशाहीसह इतर पॅनलचा दणदणीत पराभव केला.

विद्यापीठाच्या अधिसभेच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकीत 'अभाविप'प्रणीत विद्यापीठ विकास मंचने एकूण ३७ पैकी ७ जागा जिंकल्यानंतर पदवीधर गटामध्ये वातावरण निर्मिती केली होती. यामुळे पदवीधर गटातील निवडणूक चुरशीची होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र ही निवडणूक एकतर्फीच झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वात उत्कर्ष पॅनलतर्फे ही निवडणूक लढविण्यात आली.

यामध्ये १० पैकी ५ राखीव प्रवर्गातील जागांचे निकाल सकाळी सहा वाजेपर्यंत घोषित झाले होते. यात सर्वच जागी उत्कर्षच्या उमेदवारांनी प्रतिस्पर्धी विद्यापीठ विकास मंचच्या उमेदवारांवर तब्बल सरासरी ६ हजारांपेक्षा अधिक मतांनी पराभव केला. तर खुल्या प्रवर्गातील ५ जागांची मतमोजणी सकाळी सात वाजता सुरु झाली. पहिल्या पसंतीमध्ये कोणत्याही उमेदवाराने ठरवून दिलेला कोटा पूर्ण केला नसल्यामुळे द्वितीय पसंतीचे मत मोजण्यास सुरुवात केली. मात्र, या गटातही उत्कर्ष पॅनलचेच उमेदवार आघाडीवर आहेत.

यातील पहिल्या सहामध्ये सर्वच उमेदवार उत्कर्ष पॅनलचे असल्यामुळे मध्यरात्रीपर्यंत या खुल्या जागांवर उत्कर्षचेच उमेदवार बाजी मारण्याची शक्यता आहे.

खुल्या प्रवर्गात उत्कर्षची आघाडी

खुल्या प्रवर्गातील ५ जागांसाठी सर्वाधिक चुरस होती. एकूण ३३ उमेदवारांनी आपले नशीब अजमावले. यात उत्कर्षतर्फे निवडणूक लढविलेल्या ६ उमेदवारांनी सर्वाधिक पहिल्या पसंतीची मते मिळवून विजयी आघाडी घेतली आहे. या प्रवर्गात विजयासाठी २,४५४ मतांचा कोटा ठरला होता. मात्र एकही उमेदवार पहिल्या फेरीत हा कोटा पूर्ण करु शकला नाही. पहिल्या पसंतीमध्ये उत्कर्षचे डॉ. नरेंद्र काळे २,२३०, डॉ. भारत खैरनार १,९३६, प्रा. रमेश भुतेकर १,४७७, शेख झहूर खालीद १,४७६, प्रा. संभाजी भोसले १,३२०, पंडित तुपे ९३० मते घेऊन आघाडीवर आहेत. यातील पहिले पाच उमेदवार विजयी होण्याची शक्यता आहे. तर विद्यापीठ विकास मंचचे उमेदवार शेख कलीम जहांगीर ८०५, डॉ. उल्हास उढाण ७३८, डॉ. तुकाराम सराफ यांना ४१९ मते पहिल्या पसंतीमध्ये मिळाली आहेत.

राखीव प्रवर्गातील विजयी उमेदवार

◆ पदवीधर अधिसभेत अनुसूचित जाती संवर्गात उत्कर्षचे उमेदवार प्रा. सुनील मगरे यांनी ७,२२३ मतांचा कोटा पूर्ण करुन ८,५०४ मते घेऊन विजय मिळविला. तर त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार पंकज भारसाखळे यांना अवघी १९०४ मते पडली.

◆ अनुसूचित जमाती संवर्गात उत्कर्षचे सुनील निकम यांनी ९,४२१ मते घेऊन दणदणीत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी राजू सूर्यवंशी यांना २,८३६ मते मिळाली. व्हीजेएनटी संवर्गात उत्कर्षचे संजय काळबांडे यांनी ८,०४१ मते मिळवून प्रतिस्पर्धी काकासाहेब शिंदे यांचा पराभव केला. ओबीसी संवर्गात ॲड. सुभाष राऊत यांनी ८,९२३ मते घेऊन प्रतिस्पर्धी राजीव काळे यांचा पराभव केला. तर महिला राखीव गटात उत्कर्षच्या उमेदवार शीतल माने यांनी ७,४०७ मते घेऊन मंचच्या उमेदवार योगिता तौर यांचा पराभव केला. विशेष म्हणजे उत्कर्षच्या राखीव संवर्गातील सर्वच उमेदवारांनी ठरविलेला कोटा पूर्ण करुन अधिक मते मिळविली आहेत.

विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत उत्कर्षतर्फे सर्व जाती, धर्म, पंथातील सदस्यांना समान प्रतिनिधित्व दिले. खुल्या गटातही मुस्लिम, ओबीसी समाजातील व्यक्तींना उमेदवारी दिली. यामुळे विद्यापीठाच्या विकासाची जबाबदारी पुन्हा एकदा उत्कर्षच्या खांद्यावर मतदारांनी टाकली आहे. मतदारांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी सर्वच उमेदवार प्रयत्न करतील हे नक्की.

- सतीश चव्हाण, आमदार

बाद मतांचा आकडा तीन हजारांवर

पदवीधर गटामध्ये तब्बल बाद मतांचा आकडा तीन हजारांपेक्षा अधिक गेला असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गात २,४६५ मते बाद झाली. यातील बहुतांश मतपत्रिकेवर कोणत्याही उमेदवाराला पसंतीक्रम दिलेला नव्हता. अनुसूचित जमातीमध्ये २,९९७ मते बाद ठरली. व्हीजेएनटीत ३,०५२, ओबीसीत २,९००, महिला गटात २,८६९ आणि खुल्या गटात २,१९२ मते बाद ठरली आहेत.

तांत्रिक कामगार संघटनेचा ११ डिसेंबर रोजी वर्धापन दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या २० व्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन ११ डिसेंबर रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या महात्मा गांधी सभागृहात सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन खा. चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नागोराव मगर असतील. प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नंदकुमार घोडेले, उपमहापौर विजय औताडे, सभापती गजानन बारवाल, सभागृह नेता विकास जैन याशिवाय तिन्ही वीज कंपन्यांचे मुख्य अभियंते उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात वीज कंपन्यांमधील ज्वलंत विषयांवर चर्चा होणार आहे. या कार्यक्रमास तांत्रिक कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे सरचिटणीस तथा या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष सय्यद जहिरोद्दीन यांनी केले आहे.

देवगिरी कारखाना; सोमवारी सुनावणी

औरंगाबाद : फुलंब्री येथील देवगिरी सहकारी साखर कारखाना विक्रीच्या नोटिसीला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. या याचिकेवर न्या. आर.एम. बोर्डे व न्या. विभा कंकणवाडी यांच्या खंडपीठात सोमवारी (दि.११ डिसेंबर) सुनावणी होणार आहे.

हक्कासाठी माथाडी कामगारांचा आवाज बुलंद

परिवारही मोर्चात: मोठ्या संख्येने कामगार सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : काढून टाकलेल्या कामगारांना कॉस्मो फिल्मच्या व्यवस्थापकांनी पुन्हा कामावर घ्यावे, माथाडी कामगार कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी, यासह अन्य मागण्यांसाठी शुक्रवारी कॉस्मो फिल्म कंपनीतील कामगारांनी पत्नी व मुला-बाळांसह काढलेल्या मोर्चाने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.

आपल्या हक्कासाठी विविध घोषणा देऊन त्यांनी आवाज बुलंद केला. मराठवाडा लेबर युनियनच्या अंतर्गत क्रांतीचौक येथून सकाळी ११.३० वाजता मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चाचे नेतृत्व राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. सुधीर देशमुख, उपाध्यक्ष सुभाष लोमटे यांनी केले. पैठणगेट, गुलमंडी, सिटीचौक, चेलीपुरामार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आला. तेथे शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. कामगारांना कामावर घेतले नाही, तर दोन दिवसांनंतर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. मोर्चात देवीदास कीर्तिशाही, अरविंद बोरकर, छगन गवळी, रवींद्र जाधव, संजय पाटील, सदाशिव सोळंके, देवचंद आल्हाट यांच्यासह माथाडी कामगार सहभागी झाले होते.

संत एकनाथ कारखाना; याचिकेवर सोमवारी सुनावणी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : गाळप परवान्यासाठी पैठण येथील संत एकनाथ सहकारी कारखान्याच्या संचालकांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. आज याप्रकरणी न्या. आर.एम. बोर्डे व न्या. विभा कंकणवाडी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी अपेक्षित आहे, तर सचिन घायाळ यांच्या कंपनीला ताबा देण्याबाबतचा साखर आयुक्तांच्या आदेशाला जिल्हा न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत अंतरिम स्थगिती दिल्याची माहिती ॲड. कमलाकर सूर्यवंशी यांनी दिली.

संत एकनाथ साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने यंदाचा गळीत हंगाम शीला अतुल शुगरटेक या कंपनीच्या साह्याने सुरु केला आहे.

दुसऱ्या राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे आयोजन पुण्यात

सुधीर गव्हाणे: ८ हजार शिक्षक सहभागी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : माईर्स एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट आणि डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने पुणे येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या प्रांगणात १० ते १२ जानेवारीदरम्यान दुसऱ्या 'नॅशनल टीचर्स कॉंग्रेस' या तीनदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

यासंदर्भात पुणे येथील डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या उदार कला, विज्ञान व वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे व महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे महासचिव डॉ. सुधाकर जाधवर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, महाराष्ट्र शासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई), असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू), भारतीय छात्र संसद फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघ व विश्वशांती केंद्र (आळंदी), युनेस्को अध्यासन व असोसिएशन ऑफ इंडियन कॉलेज प्रिन्सिपॉल्स फेडरेशन या संस्थांच्या सहकार्यातून अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय परिषद प्रथमच होत आहे.

देशभरातून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे ८ हजार शिक्षक यामध्ये सहभागी होणार आहेत.

या परिषदेत 'भारतातील उच्चशिक्षण : आढावा आणि भावी दिशा', 'भारतातील उच्च शिक्षणाचे जागतिकीकरण : योजना आणि नियोजन', 'वैश्विक मूल्याधिष्ठित शिक्षण-विश्व शांतीचा पाया', 'उच्च शिक्षणातील गुणवत्ता-सत्य आणि सामोपचार', 'उच्चशिक्षणात तंत्रज्ञानाचा उपयोग- फायदे विरुद्ध अडथळे', 'शिक्षकांचे प्रशिक्षण' आणि 'शिक्षणाचे अर्थशास्त्र' याशिवाय विशेष अशा दोन 'टीचर टू टीचर कनेक्ट' सत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रउभारणीच्या भावनेने भारावलेल्या आणि केवळ शिक्षक म्हणून नाही, तर उत्तम संशोधक, संवेदनशील, समाजाभिमुख, प्रगतिशील आणि तत्त्वनिष्ठ शिक्षकांची फळी निर्माण करण्याचे या परिषदेचे उद्दिष्ट आहे.

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

सुनहरा मौका सीमित समय के लिये
केवल रिटेल दुकानदारों के लिए
सुनहरा मौका सभी दुकानदारों के लिये 10 रूपये का नमकीन अब मात्र 8 रूपये में और 5 रूपये का नमकीन मात्र 4 रूपये में। इस कम कीमत का लाभ सिर्फ औरंगाबाद क्षेत्र के लिये ही उपलब्ध रहेगा।
BHUJIA SEV | KHATTA MEETHA | TASTY NUTS | LITE CHIWDA
ALL IN ONE | MIXTURE | RATLAMI SEV | PUNJABI TADKA
Haldiram's NAGPUR TASTE OF TRADITION
₹5/- M.R.P. का ₹4/- में
₹10/- M.R.P. का ₹8/- में
*सभी नमकीन उत्पादों पर (मसाला व नमकीन पिनट, सेव मुरमुरा, सोयास्टिक्स, सोयाचिप्स व लेमन भेल छोडकर)
व्यापारिक पूछताछ के लिये संपर्क करे
M/S. RANA ENTERPRISES - 9822333143
ASM - MOB. : 9766152345

मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद चिकलठाणा, महात्मा गांधी मिशन आणि औरंगाबाद ड्रगिस्ट ॲण्ड केमिस्ट असोसिएशन यांच्या सहकार्याने पद्मश्री डॉ. शरदकुमार दीक्षित यांच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दि.१३ ते १७ डिसेंबरदरम्यान मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराचे हे ४२ वे वर्ष असून, अमेरिकेतील प्रख्यात सर्जन डॉ. राज लाला आणि डॉ. विजय मोराडिया हे रुग्णांवर शस्त्रक्रिया करतील. शिबिराचे उद्घाटन दि.१३ रोजी स. ८.३० वा. लायन्स आय हॉस्पिटल, एन-१ सिडको येथे होईल. उद्घाटनानंतर रुग्णांची तपासणी करण्यात येईल आणि शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांची निवड करुन त्यांना शस्त्रक्रियेची तारीख आणि वेळ देण्यात येईल.गुरुवार, दि.१४ पासून एमजीएम रुग्णालयात प्रत्यक्ष शस्त्रक्रियांना प्रारंभ होईल.

डॉ. लाला आणि डॉ. मोरडिया यांच्यासोबतच डॉ. ललिता लाला, डॉ. के.के. भाटिया, डॉ. अमित बसन्नवार शस्त्रक्रिया करतील, तसेच डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांचाही सक्रिय सहभाग असेल.

आजवर या शिबिरादरम्यान १२,७०० रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून, यंदाच्या शिबिरात दीड हजार रुग्णांची तपासणी आणि साडेचारशे रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याचा मानस असल्याचे आयोजकांनी याविषयी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. याप्रसंगी क्लबचे अध्यक्ष राजेंद्र लोहिया, प्रकल्पप्रमुख डॉ. मनोहर अग्रवाल, सचिव रवींद्र करवंदे, सुरेश बाफना, रमेश पोखर्णा यांच्यासह सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

रुग्णसेवेचा महायज्ञ

◆ डॉ. शरदकुमार यांच्या पुढाकराने शहरात हा रुग्णसेवेचा महायज्ञ सुरु झाला असून, त्यांच्या निधनानंतर त्यांच्या शिष्यांनी आणि स्नेहीजणांनी मोठ्या निष्ठेने आजतागायत तो यज्ञ अविरतपणे सुरु ठेवला आहे. हे शिबीर पूर्णपणे नि:शुल्क असून, दुभंगलेले ओठ, पडलेली पापणी, चेहऱ्यावरील व्रण, नाकावरील बाह्य विकृती असलेल्या रुग्णांवर यादरम्यान शस्त्रक्रिया करण्यात येईल. जळालेल्या, भाजलेल्या किंवा पांढरे डाग असलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात येणार नाही. रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.